महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पीन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

## प्रेस नोट

दिनांक :- १९/०७/२०२४

## चांदवड अवैध मद्य तस्करी प्रकरणातील वाहनांचा पुरवठा करणारा आरोपी सुरत मधुन अटक

---

दिनांक ०७/०७/२०२४ रोजी रात्रीचे सुमारास चांदवड-मनमाड रोडवर अवैधरित्या मद्यसाठयाची वाहतुक करणा-या कारने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या स्कॉर्पिओला दिलेल्या धडकेत राज्य उत्पादन शुल्क नाशिक विभागाचे जवान जागीच ठार झाले होते. या घटनेत लासलगाव पोलीस ठाण्याचे दोन पोलीस अंमलदार देखील गंभीर जखमी झाले होते. सदरच्या घटने बाबत चांदवड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २७३/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम १०३(१), १०९, १३२, २३८, ३२४(४), १२१ (१), (२), ३(५), ६१(२) सह मोटर वाहन का. क. १८३, १८४, १३४(अ),(ब)/१७७, ७९(१), ६१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर प्रकरणी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी तात्काळ दखल घेवून यातील गुन्हेगारांना तातडीने अटक करणेकामी जिल्हयात व परराज्यात पथके रवाना केली होती. त्यानुसार पोलीस पथकांनी सदर गुन्हयात आरोपी नामे १) देवीश पटेल, २) अशपाक अली शेख, ३) राहुल सहाणी, या तीन आरोपींना अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर गुन्हयातील उर्वरित आरोपींचे शोधार्थ स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुजरात राज्यात रवाना करण्यात आले होते. त्याप्रमाणे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सुरत शहरात सतत पाळत ठेवून मिळविलेल्या गुप्त माहितीचे आधारे सदर प्रकरणातील अवैध मद्यासाठयाचे तस्करीसाठी **चारचाकी वाहनांचा पुरवठा** करणारा आरोपी नामे **शोहेब अब्दुल गफुर अन्सारी उर्फ सोहेल छत्री,** वय ३९, रा. ७/२०१४, रामपुरा मसालजी वार्ड, हाजरा मंजिल, सुरत, राज्य गुजरात यास शिताफिने ताब्यात घेतले. त्याचे कब्जातुन सदर गुन्हयात मद्य तस्करीसाठी वापरण्यात आलेली टाटा हॅरिअर कार क्र.जी.जे.२०.ए.क्यु.४३६७ ही जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपीस वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथक करीत आहे. जिल्हयाचे सीमावर्ती भागातून होणारे अवैध मद्य तस्करीचे पाळेमुळे नष्ट करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे सत्वर कारवाई करण्यात येत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि/राजु सुर्वे, पोउनि दत्ता कांभीरे, पोउनि नाना शिरोळे, पोहवा गणेश वराडे, मुकेश महिरे, धनंजय शिलावटे, दिपक गुंजाळ, पो.ना. संदिप झाल्टे, प्रकाश कासार, रमेश चव्हाण, नितीन डावखर, मेघराज जाधव तसेच तांत्रिक विश्लेषन विभागाचे पोना प्रदिप बहिरम, हेमंत गिलबिले, भाउसाहेब टिळे यांचे पथकाने कामगिरी केलेली आहे.